पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/१२/२०२३
## दि.०७/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३६८/२०२३,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | विजय खोमणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे), पर्वती पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०८/२०२० रोजी पूर्वी ते दि.१७/०८/२०२० रोजी १४/०० वा.चे दरम्यान पर्वती टेकडीच्या वरील बाजुस,जंगला मध्ये पडक्या पाण्याच्या टाकी जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | दि.१७/०८/२०२० रोजी पुर्वी ते दि.१७/०८/२०२० रोजी १४/०० वा.चे दरम्यान पर्वती टेकडीच्या वरील बाजुस,जंगला मध्ये पडक्या पाण्याच्या टाकी जवळ,पुणे याठिकाणी यातील नमुद अनोळखी महिला,वय-अंदाजे ३० ते ४० वर्षे हिचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,कोणत्यातरी अज्ञात कारणावरून,तीचे डोक्यात व छातीत कठीण वस्तुने आघात करून,जखमी करून खुन केला आहे. (पर्वती (तत्कालीन दत्तवाडी) पोलीस ठाणेस अकस्मात मयत नं.१०२/२०२०, सी.आर.पी.सी.कलम १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,तीचा खुन झाल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.जयराम पायगुडे ९८२३०१५१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७४९/२०२३,भादविक ४९८(अ),३०६,३४ |
| **फिर्यादी** | तुकाराम कदम,वय-६६ वर्षे,रा.२३४४,नवा मोदी खाना,कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | १.मयताचा पती २.एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०७/२०१४ ते दि.०१/१२/२०२३ रोजी १२/५० वा.चे दरम्यान चिंतामणी गार्डन,आंबेगाव पठार व मोदी खाना कॅम्प,पुणे येथील फिर्यादीचे घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.प्रियांका पाटील,वय-२९ वर्षे,रा.चिंतामणी गार्डन,फ्लॅट नं.५०४, ए-आंबेगाव पठार,पुणे हिचे लग्न यातील नमुद तीचा पती आ.क्र.१ याचेबरोबर होवुन,ती त्याचेबरोबर सासरी नांदत असताना,तीचे पतीने तीच्या चारित्र्यावर संशय घेवुन,तीस वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण करुन,तसेच लग्नाचा झालेला १५ लाख खर्चाची माहेराहुन आणण्याची मागणी करून,त्याकारणावरून तीचा शारिरीक व मानसिक छळ करुन,आ.क्र.२ हिने सुदधा फिर्यादीचे राहते घरी येवुन,सौ.प्रियांका हीस शिवीगाळ करुन,तुझ्यामुळे आमचे नुकसान झालेले आहे असे म्हणुन तीचेकडे सतत पैशाची मागणी करून,सौ.प्रियांका हीस तीचे राहते घरी मोदी खाना कॅम्प,पुणे येथे गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, समीर कदम ८८०५००१४२७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ७४९/२०२३,भादविक ३०७,महा.पो.का.क.३७(१)१३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | संभाजी आंबेकर,वय-५९ वर्षे,रा.आंबेकरवस्ती,कुंजीरवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०६/१२/२०२३ रोजी १७/३० वा.वळती गावाकडे जाणा-या रोडचे लगत असणा-या सिटी स्केप प्लॉटींग मधील सिमेंटच्या अंतर्गत रोडवर,शिंदवणे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ मोहन गोरखनाथ आंबेकर,वय-५६ वर्षे,रा.सदर यास नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने,कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन,लाकडी दांडक्याने त्याचे डोक्यात तसेच चेह-यावर मारुन,त्यास गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दाभाडे ८१०८१२२०२९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**